**प्रेसनोट दि. २५.०५.२०२१**

अमोल दत्तात्रय शिंदे वय ४१ वर्ष, वनपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शिराळा व खाजगी इसम पांडुरंग रामचंद्र खुडे, वय ३७ वर्ष, व्यावसाय- लाकुड वखार चालक, रा. खंडेश्वर मंदीर जवळ, पेठ, ता. वाळवा, जि. सांगली यांना १,५००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांनी सुमारे दहा दिवसापुर्वी भाटशेरगांव येथील शेतकऱ्याचे शेतातील निलगीरीची झाडे तोडुन विक्री करीता पेठ नाका येथील यशवंत बॅकवर्ड क्लास सुतार औद्योगीक सह, संस्था पेठ चालक पांडुरंग रामचंद्र खुडे यांचे नमुद लाकुड वखारीमध्ये ट्रॅक्टर द्वारे घेवुन येवुन दोन ट्रॉल्या डंपींग केल्या होत्या सदर डंपींग केलेल्या दोन ट्रॉल्यांचेवर कारवाई न करणे करीता वनक्षेत्रपाल कार्यालय शिराळा येथील वनपाल अमोल दत्तात्रय शिंदे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे करीता २०००/- रुपये व सुशांत काळे, वनक्षेत्रपाल शिराळा यांचे करीता ५०००/- रुपये असे मिळुन एकुण ७०००/- रुपये व प्रत्येक लाकडचे ट्रॉली करीता ५००/- रुपये मंथलीची मागणी केली होती खाजगी इसम बापु यांनी वनपाल शिंदे यांना पैशे द्या नाही तर आमचे लाकुड वखारीमध्ये लाकडे आणु नका अशी तक्रार तक्रारदार यांनी इकडील कार्यालयाकडे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १९.०५.२०२१, दि.२०.०५.२०२१ व दि.२२.०५.२०२१ रोजी रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये वनपाल शिंदे व खाजगी इसम पांडुरंग रामचंद्र खुडे यांनी यांनी तक्रारदार यांच्याकडे चर्चेअंती १५००/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम दि.२५.०५.२०२१ रोजी घेवून येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.२५.०५.२०२१ रोजी यशवंत बॅकवर्ड क्लास सुतार औद्योगीक सह, संस्था पेठ चालक पांडुरंग रामचंद्र खुडे यांचे नमुद वखारीमध्ये सापळा लावला असता अमोल दत्तात्रय शिंदे वय ४१ वर्ष, वनपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शिराळा व खाजगी इसम पांडुरंग रामचंद्र खुडे, वय ३७ वर्ष, व्यावसाय- लाकुड वखार चालक, रा. खंडेश्वर मंदीर जवळ, पेठ, ता. वाळवा, जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून १५००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने अमोल दत्तात्रय शिंदे वय ४१ वर्ष, वनपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शिराळा वर्ग - ३ व खाजगी इसम पांडुरंग रामचंद्र खुडे, वय ३७ वर्ष, व्यावसाय- लाकुड वखार चालक, रा. खंडेश्वर मंदीर जवळ, पेठ, ता. वाळवा, जि. सांगली यांचे विरुध्द इस्लामपुर पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्री सुहास नाडगौडा सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे. यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे सो पोलीस उप अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक, श्री गुरुदत्त मोरे, पोलीस निरीक्षक, तसेच पोलीस अंमलदार संजय संकपाळ, धनंजय खाडे, प्रितम चौगुले, अविनाश सागर, सलीम मकानदार, श्रीपती देशपांडे, भास्कर भोरे, संजय कलकुटगी, अजित पाटील, सोहेल मुल्ला, राधीका माने, विना जाधव यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in